# रमाई आवास घरकुल योजना (ग्रामिण व शहरी)

शासन निर्णय क्रं. बिसीएच-२००८/प्र.क्रं.३६/मावक-२, दि. १५ नोव्हेंबर २००८

**प्रस्तावना :-** अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील व्यक्तींना त्यांच्या बिकट व आर्थिक परिस्थितीमुळे स्वत:च्या उत्पन्नातून चांगल्याप्रकारचे घर बांधणे शक्य होत नाही. ग्रामिण भागात बहुतांशी अनुसूचित जातीची घरे कच्च्या स्वरुपात राहतात. आर्थिक परिस्थितीमुळे पक्के घर बांधणे शक्य होत नाही हीच परिस्थिती शहरी भागात झोपडपट्टी/स्लम मध्ये राहणाऱ्या लोकांची आहे. जी रोजगारासाठी शहरात येवून येथेच कच्चे घर बांधुन राहतात. अश्या लोकांचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा याकरीता ग्रामिण व शहरी भागामध्ये स्वत:च्या जागेवर पक्के घर बांधण्याकरीता या योजनेमार्फत अर्थसहाय्य दिले जाते.

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१. अर्जदार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील असावा.
२. अर्जदाराचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान पंधरा वर्ष असावा.
३. अर्जदाराचे सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारा निर्गमित स्वत:चे जात प्रमाणपत्र.
४. अर्जदाराचे सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारा निर्गमित स्वत:चे उत्पन्नाचे प्रमाणपत्र. (ग्रामिण क्षेत्राकरीता रु.१२००००/- शहरी क्षेत्राकरीता रु. ३०००००/-
५. अर्जदाराची स्वत:च्या मालकीची जागा किंवा कच्चे झोपडे असावे. (मालमत्ता नोदणीपत्र विद्युत देयक)
६. टॅक्स पावती.
७. स्वत:चे राशन कार्ड
८. सदर योजनेचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीला देण्यात येईल.
९. लाभार्थ्याने शासनाच्या इतर गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

| व्ययक्तिक लाभार्थी अर्ज | | |
|---|---|---|
| ग्रामिण | नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत | महानगरपालिका |
| ग्रामसेभेद्वारा ठराव घेवून अनुसूचित जातीची पात्र लाभार्थी यादीस मंजुरी देवुन लाभार्थी प्रस्ताव व यादी गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयास सादर करणे. | संबंधित लाभार्थ्याने आपला अर्ज मुख्याधिकारी नगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत यांना सादर करणे. सदर अर्जाची तपासणी करुन मुख्याधिकारी कार्यालयाने सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांना अर्ज सादर करणे. | लाभार्थ्याने महानगर पालिकेच्या संबंधित झोन मध्ये अर्ज सादर करावा. संबंधित झोनने अर्जाची तपासणी करुन ती कार्यकारी अभियंता स्लम म.न.पा नागपूर यांचे कार्यालयास सादर करावी. |
| गटविकास अधिकारी यांचे कार्यालयाद्वारा सदर पात्र यादी व लाभार्थी प्रस्ताव सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांच्या कार्यालयास सादर करणे. | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी अर्जाची तपासणी करुन पात्र अर्जाची यादी जिल्हा प्रशासन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांना सादर करणे. | कार्यकारी अभियंता स्लम कार्यालयाने संबंधित अर्ज सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचे कार्यालयास सादर करावे. |
| सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाद्वारा अर्जाची तपासणी करुन पात्र अर्ज प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा यांचे कार्यालयास मंजुरी करीता सादर करणे. | जिल्हा प्रशासन अधिकाऱ्यांनी सदर पात्र अर्जाची यादी व अर्ज तपासणे. | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाद्वारा अर्जाची तपासणी करुन पात्र अर्जाची यादी महानगरपालिका यांना मंजुरीसाठी सादर करावी. |
| सदर पात्र अर्ज ग्रामिण क्षेत्रासाठी असलेली घरकुल निर्माण समितीद्वारे पात्र लाभार्थ्यांच्या यादीस मंजुरी देणे. | सदर पात्र अर्ज व लाभार्थी यादीस घरकुल निर्माण समितीद्वारा मंजुरी देणे. | सदर पात्र अर्ज व लाभार्थी यादीस घरकुल निर्माण समितीद्वारा मंजुरी देणे. |